महत्वाची नोटीस

जा.क्रं.शावैमवरुय/आस्था-३/११६५/२०२१
अधिष्ठाता यांचे कार्यालय,
श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकिय
महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ
दिनांकः- १५ /०२/२०२१

विषय - कंत्राटी डाटा एंन्ट्री ऑपरेटर या पदाच्या मुलाखतीबाबत...

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ या संस्थेमध्ये महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत कंत्राटी डाटा एंन्ट्री ऑपरेटर हे पद कंत्राटी स्वरुपात भरण्याकरीता दिनांक **०५/०२/२०२१** रोजी संस्थेच्या संकेतस्थळावर तसेच स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देण्यात आली होती. सदर कंत्राटी डाटा एंन्ट्री ऑपरेटर या पदाच्या मुलाखतीकरीता जे उमेदवार पात्र ठरविण्यात आले आहेत. त्यांना सुचित करण्यात येते की, दिनांक **१८/०२/२०२१** रोजी अधिष्ठाता यांची मा.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे सोबत व्हिडीओ कॉन्फरन्स असल्यामुंळे **दिनांक १८/०२/२०२१ रोजी होणारी मुलाखत प्रशासकीय तसेच तांत्रिक कारणास्तव अधिष्ठाता यांना प्राप्त अधिकारान्वये पुढे ढकलण्यात येत असुन पुढिल तारीख लवकरच संस्थेच्या संकेतस्थळावर (www.vngmcytl.ac.in) तसेच संस्थेच्या नोटीसबोर्ड वर प्रकाशित करण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

तसेच सदरील उमेदवारांना सुचित करण्यात येते की, आपण संस्थेच्या संकेतस्थळावर अद्ययावत राहावे व पुढिल तारखेला होणाऱ्या **मुलाखतीला आपण अनुपस्थित राहील्यास याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील याची नोंद घ्यावी**.

अधिष्ठाता
तथा समिती प्रमुख
श्री.वसंतराव नाईक शासकिय वैद्यकिय
महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ

Shrikant fiction from ८ १० २०

## महाराष्ट्र शासन

**बैठकीची सूचना/आजच**
**दि.१८/०२/२०२१, वेळ : सकाळी ११.३० वा.**
**ईमेल : medd.coordination@gov.in**

क्र.: बैठक ०२२१/प्र.क्र.१७/समन्वय.
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार,
नवीन मंत्रालय, मुंबई - ४०० ००१.
दिनांक :- १२/०२/२०२१.

प्रति,

संचालक,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.

**विषय :-** मा. प्रधान सचिव (सा. आ. वि.) यांच्याकडे आगामी होणाऱ्या मा. सचिव (वै. शि.) व इतर अधिकाऱ्यांसोबतच्या ऑनलाईन बैठकीबाबत.

**संदर्भ :-** या कार्यासनाचे समक्रमांकाचे दि.०५/०२/२०२१ व दि.१०/०२/२०२१ रोजींचे पत्र.

महोदय/महोदया,

उक्त विषयास अनुसरुन सार्वजनिक आरोग्य विभाग आणि वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांच्या खालील सूचित नमुद महत्वांच्या विषयांबाबत मा. प्रधान सचिव (सा. आ. वि.) यांच्याकडे **गुरुवार दि.१८/०२/२०२१ रोजी सकाळी ११.३० वा.** व्हिडीओ कॉन्फरसिंगच्या माध्यमातून ऑनलाईन बैठक आयोजित केली आहे. सदर ऑनलाईन बैठकीस आपण आवश्यक माहितीसह उपस्थित राहावे, असे मा. सचिव (वै. शि.) महोदयांच्या निदेशावरुन कळविण्यात येत आहे.

| अ. क्र. | विषय | मुद्दे |
|---|---|---|
| १ | महात्मा फुले जन आरोग्य योजना | या योजनेअंतर्गत विभागाच्या शासकीय वैद्यकिय महाविद्यालयांशी संलग्नित रुग्णालयांना प्राप्त होणारा महसूल अधिकाअधिक लाभार्थ्यांना लाभ देऊन वाढविणे व त्यासाठी करावयाच्या उपाययोजना. |
| २ | Maternal & Child Health (MCH) wing. | शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, औरंगाबाद येथे MCH wing स्थापन करणे. |
| ३ | कोविड-१९ अंतर्गत उपाययोजना | सार्वजनिक आरोग्य विभागाकडून कोविड-१९ उपाय योजनांतर्गत या विभागास औषधे व इतर साधनसामुग्री यांच्यासाठी प्राप्त निधी व आपल्याला यासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाकडून अपेक्षित असणाऱ्या बाबी. |
| ४ | असंसर्गजन्य रोगांचे उपचार | असंसर्गजन्य रोगांच्या उपचारार्थ सार्वजनिक आरोग्य विभागाकडून उपलब्ध होणारा निधी व आपल्याला यासंदर्भात अपेक्षित असणाऱ्या बाबी. |

| | | |
|---|---|---|
| ५ | Hospital Management Information System (HMIS) | NHM अंतर्गत या विभागास HMIS साठी सार्वजनिक आरोग्य विभागाकडून उपलब्ध होणारा निधी व आपल्या या संदर्भात अपेक्षित असणाऱ्या बाबी. |
| ६ | जिल्हा रुग्णालयमध्ये डीएनबी कोर्स सुरु करणे. | National Board of Examination (NBE) मार्फत चालविले जाणारे विविध पदव्युत्तर पदवीका कोर्सेस सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीतील जिल्हा रुग्णालयांमध्ये सुरु करणे. |
| ७ | बंधपत्रित सेवेकरिता नियुक्ती ऑनलाईन पोर्टलद्वारे करणे. | वैद्यकीय पदवी, पदव्युत्तर पदवीका, पदव्युत्तर पदवी, अतिविशेष उपचार उमेदवारांना बंधपत्रित सेवा वाटपाची कार्यवाही ऑनलाईन करण्याच्या दृष्टीने DMER व DHS या दोन्हींकरिता एक Integrated Portal विकसित करणे. |
| ८ | पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करणे | सार्वजनिक आरोग्य विभाग व वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांच्याद्वारे संयुक्तरित्या अकोला, पुणे व नागपूर (इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय) येथे पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करणे. |

सदर व्हिडीओ कॉन्फरसिंगच्या माध्यमातून होणाऱ्या ऑनलाईन बैठकीबाबत संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, महाराष्ट्र राज्य यांना कळवावे. तसेच बैठकीसाठी आवश्यक असणारी **"Link"** तयार करुन सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, महाराष्ट्र राज्य आणि सर्व संबंधितांना उपलब्ध करुन दयावी.

सदर ऑनलाईन बैठकीस आवश्यक असणारी टिप्पणी संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी मा. सचिव (वै. शि.) यांच्या कार्यालयास व या कार्यासनास **सोमवार दि.१५/०२/२०२१ रोजी दुपारी २.०० वा. पुर्वी** उपलब्ध करुन दयावी.

तसेच सदर ऑनलाईन बैठकीचे इतिवृत्त संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांनी तयार करावे व ते २ दिवसांच्या आत संबंधित कार्यासनामार्फत शासनास सादर करावे.

उपरोक्त बाबत त्वरीत कार्यवाही करावी, ही विनंती.

आपला,

12/02/21

(सं. बा. डेरे)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाही करिता रवाना :

१) मा. सचिव, वै. शि. यांचे स्वीय सहायक, वै. शि. व औ. द्र. वि., मंत्रालय, मुंबई.

२) सर्व सह सचिव/उप सचिव यांचे स्वीय सहायक, वै. शि. व औ. द्र. वि., मंत्रालय, मुंबई.